# प्रकरण सहावे

## दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना व सामाजिक विकास कार्ये

चंदगड तालुक्यासारख्या मागास भागात दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याने सामाजिक विकासाला मदत करणे व त्यासाठी उपलब्ध पैसा काळजीपूर्वक वापरणे याला विशेष महत्व आहे. दौलत शेतकरी साखर कारखान्याचे मूल्यमापन या दृष्टीने या प्रकरणात केले आहे.

### शिक्षणाच्या सोयी :

अ) शालेय शिक्षणाची सोय

कारखान्याने कामगारांच्या व नजीकच्या गावातील मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देण्यासाठी कारखान्याच्या परिसरात एक बालवाडी, एक प्राथमिक व एक माध्यमिक शाळा सुरु केल्या आहेत.[१]

ब) तंत्रनिकेतन महाविद्यालयाची स्थापना

कारखान्याने " दौलत विश्वस्त संस्था " स्थापून या संस्थेद्वारे " दौलत तंत्रनिकेतन " ऑगस्ट १९८३ पासून सुरु केलेले आहे. दौलत विश्वस्त संस्थेला कारखान्याने स्वतंत्र इमारतीची सोय उपलब्ध करुन दिली त्याच बरोबर या विश्वस्त संस्थेला स्वतंत्र शैक्षणिक परिसर निर्माण करुन दिलेला आहे.

१. शैक्षणिक इमारत
२. प्रयोगशाळा
३. वर्कशॉप (दोन इमारती)
४. वसतिगृह (दोन इमारती)

-----------

१. दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना, आस्थापना विभाग, प्रत्यक्ष मिळविलेली माहिती.

५. मेस इमारत

६. उपहारगृह

इत्यादी तंत्रनिकेतन महाविद्यालयाला आवश्यक बाबींची पूर्तता कारखान्याने केलेली आहे. या महाविद्यालयाच्या स्थापनेमुळे १९८३-८४ व १९८४-८५ या दोन शैक्षणिक वर्षात एकंदर ३५२ विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयाचा लाभ घेतला. या ३५२ विद्यार्थ्यांपैकी ११२ विद्यार्थी कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील होते.[२]

दौलत तंत्रनिकेतनची स्थापना हे दौलत कारखान्याने केलेले चांगले कार्य मानता येईल. सध्याच्या शिक्षणपध्दतीत धंदेवाईक शिक्षणपध्दतीला महत्व देण्यात येत आहे. तसेच शहरातून शिक्षण घेणे, त्याचबरोबर या अभ्यासक्रमांना प्रवेश मिळवणे सर्वसामान्यांना शक्य होत नाही. या दृष्टीने कारखान्याचे हे कार्य कौतुकास्पद आहे. या तंत्रनिकेतन प्रमाणेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू केल्यास चंदगड तालुक्याच्या औद्योगिक विकासाला आणखीन मदत होईल.

<u>पिण्याच्या पाण्याच्या सोयी</u> :

भारतात शहरांच्या तुलनेत ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या सोयीचा जास्त अभाव आढळतो. उन्हाळ्यात पाणी समस्या आणखीनच गंभीर होते.

चंदगड तालुक्यात पावसाचे सरासरी प्रमाण १२५ इंच असूनही कोणतीही मोठी पाणीपुरवठा योजना तालुक्यात अस्तित्वात नाही. त्यामुळे कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील बहुतांशी गावातून उन्हाळ्यात पाणी टंचाई जाणवू लागते. शासनाने प्राधान्य क्रमाने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी ज्या योजना कारखान्यामार्फत राबविल्या त्यांचा तपशील खालीलप्रमाणे.

| अनु. | गावाचे नाव | योजनेचा खर्च (रुपये) | योजना |
|---|---|---|---|
| १. | पुंद्रा | ३६,५४० | नदीवर |
| २. | मौजे घामापूर | ३६,००० | ,, |
| ३. | मौजे शेवाळे | ६०,००० | विहिरीवर |
| ४. | मिरवेल | ५,५५० | नदीवर |
| ५. | नामखोल | १२,५४० | विहिरीवर |
| ६. | मळवी | ३,९७८ | ,, |
| ७. | वाघोत्रे | ४,२०० | ,, |
| ८. | तेवूरवाडी | २२,००० | ,, |
| ९. | अलबादेवी | १५,६०० | ,, |
| १०. | गणूचे वाडी | १४,५१० | ,, |
| ११. | मोगोली | २१,६०० | नदीवर |
| १२. | सडे गुडवळे | २५,५०० | ,, |
| १३. | किटवाड | ३१,००० | विहिरीवर |
| १४. | कुरणी | ४१,३३० | नदीवर |
| १५. | पार्ले | २४,००० | विहिरीवर |
| १६. | आडकूर | ६,००० | ,, |
| १७. | कौलगे | ३९,००० | ,, |
| १८. | हाल्लारवाडी | ७२,००० | ,, |
| १९. | कैचेवाडी | ४,६८० | ,, |
| २०. | मांडेदुर्ग | - | - |
| २१. | कोदाळी | - | - |
| २२. | मजरे कार्वे | - | - |
| | एकूण : | ३,८७,३२८ | |

संदर्भ : दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना,
आस्थापना विभाग, प्रत्यक्ष मिळविलेली माहिती.

अशाप्रकारे २२ योजना राबविण्याचे ठरलेले असून त्यापैकी १९ योजनांवर रु. ३,७७,३२६ इतकी रक्कम १९८४-८५ अखेर खर्च झालेली आहे.

कारखान्याचा हा उपक्रम स्तुत्य असला तरी या योजनांची कार्यवाही जास्त कसोशिने व काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे. या योजनाबाबत मिळालेल्या माहितीच्या आधारे पुढील गोष्टी नमूद करता येतील.

१) यातील काही योजना नैसर्गिक झा-यातून पाईपलाईन टाकून बांधलेल्या आहेत. पण झारे उन्हाळ्यात आटतात व पुन्हा पाणी टंचाईची समस्या कायम राहते. योजना आखत असताना ऐन उन्हाळ्यात पाणी कसे मिळेल याचा विचार होणे आवश्यक आहे.

२) मांडेदूर्ग, कोदाळी व कार्वे योजना तयार झाल्या त्या १९८२-८३ च्या निवडणूक हंगामात. परंतु निवडणूक निकालानंतर या योजनांची कार्यवाही झाली नाही. कारण ही गावे सत्तारूढ गटाच्या विरोधातील मानली जातात. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यातले राजकारण म्हणून ही घटना लक्षात घेण्याजोगी आहे.

३) <u>सामाजिक वनीकरण</u> :

निसर्गाचा ढळून येणारा असमतोल लक्षात घेऊन दिवंगत पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी सामाजिक वनीकरण कार्यक्रमाला २० कलमी कार्यक्रमात अग्रस्थान दिले. वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धनाच्या कार्यक्रमात सर्व समाजाला सहभागी करून घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य सरकारकडून सामाजिक वनीकरण कार्यक्रमाची अंमलबजावणी केली गेली. शासनाच्या या धोरणाला साथ द्यावी म्हणून दौलत सहकारी साखर कारखान्याने हातभार लावलेला दिसून येतो. कारखान्याच्या मालकीच्या प्लॅाटमध्ये रोपवाटिका तयार करून निलगिरी, सु बाभूळ, काजू, बांबू, ऑस्ट्रीयन, बाभूळ इत्यादी झाडांची रोपे तयार करून सभासद शेतक-यांना पुरविलेली आहेत. तसेच पंचायत समिती चंदगड मधून दिल्या जाणा-या नारळ, चिक्कू, आंबा या फळझाडांचा व गुलमोहर, सुरू, सिंद्धी या व इतर जंगली रोपांचा पुरवठा कारखान्यामार्फत केलेला आहे.

## कारखान्याने सामाजिक वनीकरणासाठी वाटलेल्या रोपांचा तपशील

| रोपांचा प्रकार | ७७-७८ | ७८-७९ | ७९-८० | ८०-८१ | ८१-८२ | ८२-८३ | ८३-८४ | ८४-८५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आंबा | ५५१ | १२६० | १५२० | २७०० | १०० | १००० | २२६५ | ४००४ |
| नारळ | ८११ | २३२० | १७०० | १२०० | १६२६ | ७०० | ३००९ | ३२८३ |
| चिक्कू | ३३९ | ७९९ | ६०० | ९०० | ७०० | ४०० | १६१३ | २४६५ |
| निलगिरी | - | - | | १५००० | १००००० | १२०००० | १५०००० | २२१६२५ |
| सू-बाभूळ | - | - | | २०००० | १३२००० | १७५००० | ७५००० | ५०००० |
| गुलमोहर | - | - | | - | ३००० | ५०००० | ४७००० | १०००० |
| सुरू | - | - | | - | २००० | ५००० | २००० | १०००० |
| सेंद्री | - | - | | - | - | ५००० | ४००० | ५००० |
| बांबू | - | - | | - | ३४०० | ६५००० | ६००० | २५००० |
| ऑ.बाभूळ | - | - | | - | ८१००० | ८०००० | - | ३५००० |
| एकूण : | १७४१ | ४३७९ | ३८२० | १७४८०० | ३५५२२६ | ५०२१०० | २९०८८७ | ४७६३७७ |

संदर्भ : दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना, वार्षिक अहवाल,
१९७७-७८ ते १९८४-८५.

कारखान्याने सामाजिक वनीकरण कार्यक्रमाला सक्रिय हातभार लावलेला असला तरी कारखान्याने पुरविलेल्या रोपांची योग्य प्रकारे लागण आणि देखभाल यावर या कार्यक्रमाचे यश अवलंबून आहे. रोपवाटीकेसाठी येणारा खर्च भाग विकास निधीतून खर्च केला जातो हा खर्च सत्कारणी लागावा त्याचा अपव्यय होऊ नये यासाठी योग्य ते धोरण कारखान्याने स्वीकारावे.

परिसरातील शिक्षण संस्थाना मदत :

कारखान्याच्या कार्यक्षेत्रात एकूण १७१ प्राथमिक शाळा, १६ माध्यमिक शाळा व १ कनिष्ठ महाविद्यालये आहेत.[१] या शिक्षण संस्थांना वेळोवेळी लागणारी पैशाची गरज तसेच शाळा इमारतीच्या बांधकामासाठी कारखान्याकडून पुढीलप्रमाणे आर्थिक सहाय्य मिळालेले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

प्राथमिक शाळांना आर्थिक मदत

| अनु. | गावाचे नाव | रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १) | कोदाळी | ३,५०० |
| २) | बुझावडे | १,५०० |
| ३) | कुरणी | १,५०० |
| ४) | नांदवडे | २,५०० |
| ५) | गवसे | ४,००० |
| ६) | गौळवाडी | १,००० |
| ७) | नरेवाडी | २,००० |
| ८) | पुंद्रा | २,००० |
| ९) | चंदगड | २,००० |
| | एकूण | २०,००० |

--------

१. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चंदगड यांचेकडून प्रत्यक्ष मिळविलेली माहिती.

## माध्यमिक शाळांना आर्थिक मदत

| अनु. | गावाचे नाव | रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १) | शिवनगे | २००० |
| २) | कार्वे | २००० |
| ३) | तुर्केवाडी | २००० |
| ४) | कोवाड | २००० |
| ५) | घोटगेवाडी | २००० |
| ६) | माणगाव | २००० |
| ७) | कुदनूर | २००० |
| ८) | पाटणे | २००० |
| ९) | तुडये | २००० |
| १०) | आडकूर | २००० |
| | एकूण : | २०००० |

संदर्भ : दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना, आस्थापना विभाग, प्रत्यक्ष मिळविलेली माहिती

### अपंग विद्यार्थ्यांना आर्थिक मदत :

कारखाना कार्यक्षेत्रातील अपंग विद्यार्थ्यांना संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांच्या शिफारशीनुसार व कारखान्याच्या डॉक्टरांच्या तपासणी अहवालानुसार आर्थिक मदत देण्याचे कारखान्याचे धोरण आहे. भाग विकास निधीमधून १९८४-८५ अखेर ११ अपंग विद्यार्थ्यांना रु. ६५५० आर्थिक मदत कारखान्यांने दिली.[४]

---

४. दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना, आस्थापना विभाग प्रत्यक्ष मिळविलेली माहिती.

घरकुल योजना :

ज्या व्यक्ती बेघर आहेत त्या व्यक्तींना ` पंचायत समिती ` व तहशीलदार कार्यालय, चंदगड यांचे शिफारशीनुसार कारखान्याने घरकुल योजना राबविली. १९८४-८५ अखेर ३१ बेघरांना रु. १,२१,००० आर्थिक मदत कारखान्याकडून मिळालेली आहे.[५] आणि या घरांची बांधणी पूर्ण झालेली आहे.

अन्य कार्ये :

अ) क्रीडा सहभाग -

महाराष्ट्रातील आंतर सहकारी साखर कारखान्यांचे विविध खेळांचे सामने, ` साखर संघ, मुंबई ` यानी आयोजित केले होते त्यामध्ये कारखान्यातील खेळाडूंनी विशेष प्राविण्य मिळविलेले आहे.

ब) युवक मंडळाना मदत -

युवा वर्षानिमित्त, युवकांना विधायक कार्यासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी नोंदणीकृत युवक मंडळाना रु. २००० ते ५००० ची आर्थिक मदत दिलेली आहे. १९८४-८५ अखेर कार्यक्षेत्रातील ९ युवक मंडळाना रु. २१००० ची आर्थिक मदत दिलेली आहे. चंदगड तालुक्यात एकूण ६५ युवक मंडळे स्थापन झालेली असून[६] दिलेली मदत ही राजकीय हीत लक्षात घेऊन दिलेली असल्याचे दिसून येते.

क) वैद्यकीय सवलती

कारखाना कार्यक्षेत्रातील लोकांना मोफत वैद्यकीय सवलतींचा लाभ मिळावा म्हणून ` बालरोग चिकित्सा शिबीर ` बेळगांव मधील ख्यातनाम डॉक्टरांच्या साहाय्याने ४-५-८७ रोजी कारखान्यावर आयोजित केली होते. या शिबिरामार्फत

----------

५. उपरोक्त. दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना, प्रत्यक्ष मिळविलेली माहिती.

६. उपरोक्त.

मोफत इंजेक्शन्स, टॉनिक्स, लोकांना पुरविण्यात आली. या शिबीराचा फायदा ७५० बालकांनी घेतला.

तसेच कारखान्याने नेत्रचिकित्सा, बहुविध रोग निदान शिबीर आयोजित करून डॉक्टरांच्याकडून मोफत तपासणी व औषधोपचार यांसाठी मदत केलेली आहे.

कारखान्याने २९-११-१९८१ रोजी पुरुष नसबंदी शिबीर पंचायत समिती, चंदगड, आणि जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्या सहाय्याने आयोजित करून या शिबीरामार्फत १२५ पुरुष शस्त्रक्रिया करण्यात आल्या. शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या व्यक्तीस ५ भांडी देऊन कारखान्याने कुटुंब नियोजन कार्यक्रमाला मदत केली.[७]

ठ) <u>देवालय</u> -

कारखान्याने आपल्या परिसरात ५ लाख रुपये खर्च करून प्रशस्त गजानन देवालय उभारलेले आहे. अजून संपूर्ण देवालयाचे बांधकाम पूर्ण व्हायचे आहे. १९८-८७ अखेर ते पूर्ण होईल.[८]

सहकारी साखर कारखान्याकडे अनेक मार्गांनी निधी जमा होतो. हा निधी सर्वसामान्य शेतकऱ्यांकडून गोळा केला जातो, म्हणून ह्या निधीचा वापर सर्वसामान्यांच्या साठी व्हावा ही अपेक्षा असते. कारखान्याकडे भाग विकास निधी म्हणून लाखो रुपये जमा झालेले आहेत. हा पैसा राजकीय हेतूशिवाय वापरला गेला तर हा कारखाना सामाजिक विकासात फार महत्वाची कामगिरी करू शकेल.

----------

७. दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना, आस्थापना विभाग यांचेकडून.

८. दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना, आस्थापना विभाग यांचेकडून, प्रत्यक्ष मिळविलेली माहिती.